
भगतसिंह जनअधिकार यात्रा पुस्तिका - 02

# कामगार-कष्टकऱ्यांची स्थिती






## भगतसिंह जनअधिकार यात्रा

**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि कष्टकरी जनतेच्या लुटीविरोधात!**

**रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा, निवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!**

# कामगार-कष्टकऱ्यांची परिस्थिती

सहयोग मूल्य : 10 रुपये

*जर आपण लढलो नाही*
*जर आपण लढत गेलो नाही*
*तर दुश्मन*
*त्यांच्या बंदुकांनी*
*आपल्याला नष्ट करून टाकेल*
*आणि मग*
*आपल्या हाडांकडे बोट दाखवून म्हणेल*
*बघा,*
*ही गुलामांची हाडे आहेत*
*गुलामांची!*

---

भगतसिंह जनअधिकार यात्रेकरिता प्रकाशित
मे 2023
**प्रकाशक:** परमेश्वर जाधव, संपर्क: 77983 64729
**मुद्रणस्थळ:** आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे-411030
**सहयोग मूल्य:** रु. 10/-
www.bsjayatra.com, fb.com/bsjayatra

# वाजला बिगुल, कष्टकऱ्या तू जाग!
# एका ठिणगीने लागेल आग!

सध्या संपूर्ण देशातील शहरी व ग्रामीण कामगार कष्टाच्या ओझ्याखाली, कंबरतोड महागाई आणि गरिबीच्या ओझ्याखाली पिळून निघत आहेत. स्वतःचे व मुलाबाळांचे पोट कसेबसे भरण्यासाठी कामगार भांडवलदारांच्या कारखान्यांमध्ये तेलाच्या घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे भरडले जात आहेत. हाडतोड मेहनत करूनही मजुरी एवढी कमी आहे की जेमतेम कसे-बसे जगणे शक्य आहे. वरून कारखान्यांमध्ये सुद्धा रोजगार जाण्याची टांगती तलवार कायम लटकत राहते आणि ग्रामीण भागातही पूर्ण महिनाभर काम मिळत नाही. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की मोठ्या संख्येने कामगार हताश होऊन आत्महत्या करण्यास बाध्य होत आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने (नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो) 2021 मध्ये जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार **2019 ते 2021 या कालावधीत 1 लाख 12 हजार रोजंदारी कामगारांनी आत्महत्या केल्या आहेत**. याच काळात शेतीशी निगडित 31,839 लोकांनी आत्महत्या केल्या, ज्यामध्ये जवळपास निम्मी संख्या शेतमजुरांची आणि निम्मी गरीब शेतकऱ्यांची आहे.

शहरी आणि ग्रामीण मजुरांच्या भयंकर शोषण आणि त्रासाला लुटीवर आणि खोटेपणावर आधारित मीडियाद्वारे झाकून टाकले जात आहे. जनतेची दिशाभूल करण्यासाठी रात्रंदिवस देशाच्या प्रगतीचे गुलाबी चित्र प्रस्तुत केले जाते. या चित्रात ज्यांनी सुईपासून जहाजापर्यंत सर्व काही बांधले आहे, ज्यांच्या खांद्यावर संपूर्ण सभ्यतेचा भार आहे, ते मजूर कुठेच नसतात. चला, मजुरांचे कामाचे तास, मजुरी, कामाची परिस्थिती, अपघातामुळे होणारे मृत्यू, कामगार कायद्यांद्वारे मिळणारे संरक्षण आणि 'गरिबाचा मुलगा' बनण्याचे नाटक करणाऱ्या मोदींच्या कामगार-

विरोधी कारनाम्यांवर वस्तुस्थिती आणि आकडेवारीच्या माध्यमातून नजर टाकूयात.

## कामगारांचे कामाचे तास

भारतात विविध व्यवसायांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या **48 कोटींहून** अधिक आहे. यापैकी केवळ **2.75 कोटी** कामगार म्हणजेच एकूण कामगार लोकसंख्येच्या **6 टक्के** लोक संघटित क्षेत्रात काम करतात, जेथे कामाचे तास, ओव्हरटाईम, सामाजिक सुरक्षा यासंबंधीचे कामगार कायदे काही प्रमाणात लागू केले जातात. उर्वरित **94 टक्के** कामगारांसाठी कामाचे तास, किमान वेतन, ओव्हरटाईम, सामाजिक सुरक्षा इत्यादींबाबतचे कायदे म्हणजे केवळ एक थट्टाच आहे. कामगार दिनासाठी (मे दिवस) शहीद झालेल्या हुतात्म्यांमुळे जगभरातील कामगारांसाठी कायदेशीररीत्या 8 तास कामाचा दिवस मान्य झाला होता. आपल्या देशातही स्वातंत्र्यानंतर 8 तास कामाचा नियम करण्यात आला. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की बहुतेक कामगारांना 12-12, 14-14 तास एकाच दराने ओव्हरटाईमसह काम करावे लागते. अनेक कामगारांच्या राहत्या घरापासून कामाचे ठिकाण लांब असल्याने कामगारांचा येण्या-जाण्याचा वेळ जोडला तर त्यांना एका दिवसाची मजुरी मिळण्यासाठी 16 ते 17 तास खर्च करावे लागतात. तांत्रिकदृष्ट्या प्रगत असूनही आठवड्यात कामाचे तास सर्वाधिक असलेल्या देशांपैकी भारत एक आहे. एका आकडेवारीनुसार 1970 मध्ये कामगार वर्षाला 1,976 तास काम करत होते, जे 2020 मध्ये 2,174 तासांपर्यंत वाढले, म्हणजे यात 10 टक्के वाढ झाली. खालील सारणी वेगवेगळ्या देशांमध्ये कामाच्या तासांमध्ये फरक दर्शवते:


| देश | दर आठवडा कामाचे तास |
|---|---|
| **फ्रांस** | 35 |
| **ऑस्ट्रेलिया** | 38 |
| **दक्षिण कोरिया** | 40 |
| **अमेरिका** | 40 |
| **रशिया** | 40 |
| **भारत** | 48 (नवीन लेबर कोडनुसार 12 तास प्रतिदिन) |


मजुरी कमी असल्यामुळे, मजुरीच्या तुलनेत महागाईत तेजीने वाढ झाल्याने, रोज काम मिळत नसल्याने आणि तीव्र बेरोजगारी यामुळे अनेक वेळा मजूर स्वत: 8 तासांपेक्षा जास्त कामाच्या शोधात असतात, जेणेकरून ते महिन्याच्या खर्चासाठी पैसे उभे करू शकतील.


## मजुरी

देशातील शहरी आणि ग्रामीण कामगारांची मजुरी माणसाप्रमाणे जगण्याच्या अटीपेक्षाही कमी आहे. कामगार मंत्रालयाच्याच आकडेवारीनुसार भारतातील 45 टक्के मजुरांना 10,000 रुपयांपेक्षा कमी वेतन दिले जाते, तर महिला मजुरांना (एकूण कामगार लोकसंख्येच्या 32 टक्के) 5,000 रुपयांपेक्षाही कमी पगार मिळतो. जेव्हाकी सातव्या वेतन आयोगाने निश्चित केलेले किमान मासिक उत्पन्न 18,000 रुपये आहे. खालील आलेख विविध राज्य सरकारांद्वारे जाहीर आणि ऑनलाइन उपलब्ध असलेले सर्वात अलीकडचे किमान वेतन दर दर्शवितो. हे आकडे पाहताना हे देखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे की ही घोषित केलेली किमान मजुरी आहे, ना की वास्तवात दिली जाणारी मजुरी! वास्तव हे आहे की सर्व राज्यांमध्ये बहुतांश कामगारांना घोषित केलेले किमान वेतन मिळत नाही.

**ग्रामीण भागातील मजुरांची अवस्था तर अधिकच बिकट आहे.** आलेखानुसार, भारतात कृषी क्षेत्रात सरासरी मजुरीचा दर **344 रुपये रोज** आहे. परंतु सत्य हे आहे की शेतमजुरी, भट्टीकाम, इमारत बांधकाम इत्यादी काम करणाऱ्या अनेक






मजुरांना **200 ते 250 रुपये रोज या दराने काम** करावे लागत आहे. ग्रामीण मजुरांसाठी कामाची नियमितता, वेळेवर मजुरी, सुरक्षा आणि भरपाई या गोष्टी तर दूरच राहिल्या.

'मनरेगा' अंतर्गत देशभरात सुमारे **13 कोटी मनरेगा कामगार** नोंदणीकृत आहेत. वेगवेगळ्या राज्य सरकारांनी त्यांच्यासाठी रु. 200 ते रु. 250 पर्यंतची मजुरी ठरवली आहे. ही योजना आणि त्यात निश्चित केलेले वेतन हे सरकारचा ग्रामीण मजुरांबद्दलचा दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी पुरेसा आहे. 100 दिवसांच्या रोज 200 रुपयांच्या कमाईवर एखादे कुटुंब जगू शकेल असा विचार करणेच मूर्खपणाचे आहे. बहुतांश ठिकाणी 100 दिवस तर लांबच, 30-40 दिवसदेखील काम मिळत नाही हे वास्तव आहे. मनरेगामध्ये चाललेला भ्रष्टाचार सर्वांना माहितीच आहे. परंतु, या योजनेंतर्गत विविध राज्यांना देण्यात येणारे 7 हजार 257 कोटी रुपयेसुद्धा केंद्र सरकारने दिलेले नाहीत.

याच प्रकारे गाव-शहरांमध्ये काम करणाऱ्या अंगणवाडी, आशा वर्कर सारख्या

योजना कामगारांची अवस्था सुद्धा वाईट आहे. देशभरात सुमारे **39 लाख स्कीम वर्कर्स (आशा आणि अंगणवाडी कर्मचारी)** कार्यरत आहेत. पोलिओविरोधी लस देण्यापासून ते लहान मुलांना पोषण आहार वाटप करण्याच्या आरोग्य विभागाच्या जवळपास सर्व मूलभूत कामांचा आणि लहान मुलांच्या शालेयपूर्व शिक्षणापर्यंतच्या कामाचा सर्व भार यांच्याच खांद्यावर आहे. नियमित आणि अत्यावश्यक काम करणाऱ्या या योजना कामगारांना सरकारने स्वत:चे कर्मचारी मानणे तर दूरच, उलट त्यांना सरकार अत्यंत तुटपुंजे वेतन देते. हरियाणा, केरळ, दिल्ली (जिथे त्यांना 9 ते 11 हजार रुपये मजुरी मिळते, जी त्यांच्या मागणीपेक्षा कमीच आहे) ही राज्ये सोडल्यास, बहुतेक ठिकाणी अंगणवाडी सेविका आणि आशा कार्यकर्त्यांना मिळणारे वेतन हे केवळ 2500 ते 5000 रुपयांच्या दरम्यान आहे. तसे तर आजच्या महागाईच्या काळात 9 ते 11 हजार रुपये मानधनसुद्धा अतिशय तुटपुंजे आहे. नियमित कर्मचार्यांचा दर्जा मिळावा, ठरलेल्या वेतनाप्रमाणे थकबाकी मिळावी इत्यादी मागण्यांसाठी 'दिल्ली स्टेट अंगणवाडी वर्कर्स अँड हेल्पर्स युनियन'च्या नेतृत्वाखाली 22,000 अंगणवाडी सेविकांचा मोठा संप 38 दिवस (31 जानेवारी 2022 ते 9 मार्च 2022) दिल्लीत चालला होता. केजरीवाल सरकारने संप मोडून काढण्यासाठी सेवा समाप्तीचे पत्र, कारणे दाखवा नोटीस इत्यादीद्वारे धमकावून, खोटे एफ.आय.आर. नोंदवून संप मोडून काढण्याचे अनेक प्रयत्न केले, परंतु संप अधिकच मजबूत होत गेला. परिणामी, केजरीवाल सरकारने केंद्रातील मोदी सरकारसोबत संगनमत करून सहा महिन्यांसाठी हेस्मा (हरियाणा अत्यावश्यक सेवा कायदा) कायदा लागू करून संपावर बंदी घातली आणि 884 महिलांना कामावरून काढून टाकले. कायदेशीर लढाई सोबतच ही संघटना आजही अनेक स्वरूपात हा संघर्ष करत असून अनेक प्रसंगी शासन व प्रशासनाला गुडघे टेकावे लागले आहेत.

**सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांच्या हक्कांवरचे हल्ले तीव्र झाले आहेत.** जुनी पेन्शन योजना 2005 मध्ये अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळातच रद्द करण्यात आली होती. आता कर्मचार्यांचे अनेक भत्ते रद्द करण्याबरोबरच मोदी सरकारने विविध विभागच खासगी हातात विकायला काढले आहेत. कायमस्वरूपी भरतीवर बंदी घालण्यात आली आहे. विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना ओव्हरटाईम करावा लागत आहे. संघटित क्षेत्रातील कामगारांना कामगार कायद्यांद्वारे तुलनेने जे अधिक संरक्षण मिळत होते तेद्धा

नवीन कामगार कायद्यांद्वारे हिसकावून घेण्याची तयारी झालेली आहे.


## कामाच्या ठिकाणची परिस्थिती

**देशभरातील कामगार अत्यंत अमानवी आणि धोकादायक परिस्थितीत काम करतात.** बहुतांश कारखान्यांमध्ये हेल्मेट, हातमोजे इत्यादी साध्या गोष्टींसहित सर्व सुरक्षितता उपकरणांचा तीव्र तुटवडा आहे. अनेक कारखान्यांच्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. अनेक ठिकाणी हवेशीर खिडक्या, उंच छत, अपघात झाल्यास त्वरित बचावाचे कोणतेही साधन नाही. अत्याधुनिक मशिनवर वेगासरशीने काम केल्यामुळे, जास्त कामामुळे आलेला थकवा आणि वेग कमी होऊ नये म्हणून मालकांनी सेन्सर काढून टाकल्यामुळे कामगार दररोज अपंगत्वाला आणि मृत्यूला बळी पडत आहेत. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या मोठ्या संख्येला ना ई.एस.आय. ची सुविधा आहे ना कुठल्या विम्याची. कामगार विभाग आणि पोलीस तसेही सामान्यतः मालकांच्या बाजूनेच सक्रिय असतात. अपघात झाला तर मालक काहीतरी किरकोळ भरपाई देऊन बाहेरचा रस्ता दाखवतो आणि बऱ्याच वेळा तर तेही करत नाहीत. कामगार गंभीर जखमी, अपंग झाले किंवा मरण पावले तरी मालक आणि प्रशासन कोणत्याही कायदेशीर कारवाईच्या जागी काहीतरी तोडपाणी करून संपूर्ण प्रकरण दाबून टाकतात.

*एक स्क्रू पडतो जमिनीवर*
*ओव्हरटाईमच्या या रात्री*
*सरळ जमिनीच्या दिशेने, चकाकत*
*तो वेधणार नाही कोणाचेच लक्ष*
*अगदी गेल्या वेळी सारखाच*
*जेव्हा अशाच एका रात्री*
*एक माणूस आदळला होता जमिनीवर*
*- जू लिझी (चिनी कामगार आणि कवी, 1990-2014)*

श्रम व रोजगार मंत्रालयाच्या 'महानिदेशनालय, फॅक्टरी सल्ला सेवा आणि श्रम संस्थे'च्या आकडेवारीनुसार 2017 ते 2020 दरम्यान भारतातील नोंदणीकृत

**नोंदणीकृत कारखान्यांमध्ये 2017-2020 दरम्यान जीवघेण्या दुर्घटना**




कारखान्यांमध्ये अपघातांमुळे **दररोज सरासरी 3 लोकांचा मृत्यू झाला आणि 11 जण जखमी झाले.** भारतात 2017 आणि 2020 च्या मध्ये नोंदणीकृत कारखान्यांमध्ये **दरवर्षी सरासरी 1,109 मृत्यू आणि 4,000 हून अधिक कामगार जखमी** होण्याचे आकडे समोर आले आहेत. **पण या आकडेवारीतूनही अपघातांचे खरे चित्र समोर येत नाही कारण एकीकडे मोठ्या प्रमाणात मजूर अनौपचारिक क्षेत्रात काम करत आहेत आणि दुसरीकडे औपचारिक क्षेत्रात घडणाऱ्या सर्व घटनांची नोंदच होत नाही. इतर काही आकडेवारी अजून भीषण चित्र मांडते.** आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या म्हणण्यानुसार, **कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपघातांमुळे भारतात दररोज 38 बांधकाम कामगारांचा मृत्यू होतो.** 11 नोव्हेंबर 2022 रोजी दिल्लीच्या श्रम विभागाने प्रसारित केलेल्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर 2022 पर्यंत दिल्लीत 13,464 नोंदणीकृत कारखाने होते. 2018 ते 2022 या कालावधीत कारखान्यात झालेल्या अपघातात 118 कामगारांना आपला जीव गमवावा लागला होता. या मृत्यूंसाठी जबाबदार असलेल्या मालक लोकांचे सहसा काहीही वाकडे होत नाही. जसे की, याच कालावधीत कारखाना अधिनियम, 1948 अन्वये केवळ 14 जणांना गुन्ह्यांसाठी शिक्षा झाली. ग्रामीण भागात शेतात, विटभट्ट्या, इमारत बांधकाम इ. ठिकाणी काम करणारे मजूर अपघातग्रस्त होत राहतात. परंतु ग्रामीण भागात कामगार कायदा आणि त्यासंबंधी कुठलीही संरचनाच अस्तित्वात नाही. **ही परिस्थिती सुधारण्याऐवजी मोदी सरकारने 2020 मध्ये औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य कायदा सुधारणा (ओ.एस.एच.) पारित केले**

**आहे, ज्यामध्ये कारखान्यांना कामगार निरीक्षकांकडून तपासणी न करण्याची सूट देण्यासारख्या सर्व सवलती देण्याची तयारी केली गेली आहे.**

## कामगारांच्या निवासाची परिस्थिती

**कारखान्यात काम करणारे अधिकांश कामगार (बहुसंख्य स्थलांतरित) नाले, रेल्वे लाईनजवळील झोपडपट्ट्या आणि फूटपाथवर राहतात.** राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण संस्थेच्या (एन.एस.एस.ओ.) 69 व्या पाहणीत असे आढळून आले की देशात **33,510 झोपडपट्ट्या** आहेत ज्यापैकी 13,761 घोषित (notified) आणि 19,749 अघोषित आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार **1.392 कोटी झोपड्यांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या 6.549 कोटी होती.** संपूर्ण देशातील सुमारे **5.4 टक्के लोकसंख्या आणि 17.4 टक्के शहरी लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते. या झोपडपट्ट्यांमध्ये शुद्ध पाणी, स्वच्छता, आरोग्य सेवा या मूलभूत सुविधाही नाहीत.** उघडे पडलेले नाले कचऱ्याने भरलेले आहेत. सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत वाईट आहे. विविध प्रकारचे आजार इथे सतत पसरत राहतात. या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांची मते मिळवण्यासाठी विविध भांडवली पक्षांचे नेते त्यांची निवडणूक ओळखपत्रे तर बनवून देतात मात्र या झोपडपट्ट्या



कधी उद्ध्वस्त करून टाकल्या जातील याचा नेम नाही. अनेक वेळा कोणतीही माहिती न देता, सामान काढण्यासाठी वेळ न देता वस्ती जमीनदोस्त केली जाते. या वस्त्यांमध्ये उन्हाळ्याच्या दिवसात सतत आगी लागत राहतात, बऱ्याचदा त्या लावल्या जातात. आपले रक्त आणि घाम आटवून, पै-पै जोडून कामगार जो काही थोडाफार संसार उभा करतो तो सुद्धा कधी सरकारी बुलडोझरने तर कधी आगीने उद्ध्वस्त होतो आणि त्यांना त्याची भरपाईही मिळत नाही.

अनेक कामगार लॉजच्या छोट्या खोल्यांमध्ये कोंबून दाटीवाटीने राहतात. अनेक खोल्यांमध्ये कामगार पाळीपाळीने राहतात. लॉजमध्ये राहणाऱ्या कामगारांना

कारखानदारांनंतर घर मालकांचा जाच सहन करावा लागतो. बहुतांश लॉजचे मालक स्वत:ची दुकाने उघडून बसतात. मजुरांना घरमालकाच्या दुकानातून निकृष्ट दर्जाचा माल घ्यायला सक्ती केली जाते अन्यथा खोली रिकामी करायला लावली जाते.

ग्रामीण भागातही पेरणी आणि कापणीच्या वेळी शेतात, विटभट्ट्यात, इमारत बांधकामात काम करणाऱ्या परप्रांतीय मजुरांची अवस्था बिकट असते. हे मजूर पेंढा किंवा विटांनी बनवलेल्या छोट्या तात्पुरत्या खोलीसारख्या ठिकाणी राहतात. आणि वीज नसल्याकारणाने ते तीव्र थंडी आणि उष्णतेचा सामना करत राहतात.

## कष्टकऱ्यांच्या लुटीवर उभी आहे भांडवलदारांची सोन्याची लंका

**देशातील कष्टकरी जनतेची स्थिती जाणून घेतल्यावर, कामगारांच्या मेहनतीच्या लुटीवर सोन्याची लंका उभी करणाऱ्या भांडवलदारांची काय स्थिती आहे ते पाहूयात.**

**1984 मध्ये एकूण उत्पादन खर्चाच्या 45 टक्के हिस्सा मजुरी म्हणून दिला जात होता, तो 2010 पर्यंत 25 टक्के एवढा झाला. संघटित क्षेत्रात निर्माण होणाऱ्या प्रत्येक 10 रुपयांमागे कामगार वर्गाला केवळ 23 पैसे मिळतात.** ऑटो क्षेत्रातील एका अभ्यासानुसार, तंत्रज्ञानाच्या विकासाचा हिशोब पाहता, **ऑटो क्षेत्रातील कामगार 8 तासाच्या आपल्या कार्यदिवसात त्याच्या मजुरीएवढे मूल्य केवळ 1 तास 12 मिनिटांत निर्माण करतो जेव्हा की उरलेले 6 तास 48 मिनिटे तो विनामोबदला काम करतो.** कामगारांच्या श्रमाच्या याच लुटीवर भांडवलाचा डोंगर उभा आहे. ऑक्सफॅमच्या 'सर्व्हायव्हल ऑफ द रिचेस्ट: द इंडिया स्टोरी' या अहवालानुसार, **भारतात गरिबांची संख्या 23 कोटी आहे तर दुसरीकडे 2020 मध्ये 102 असलेली अब्जाधीशांची संख्या 2022 मध्ये वाढून 166 झाली आहे. 1981 मध्ये भारतातील वरच्या 10 टक्के श्रीमंतांची संपत्ती देशाच्या एकूण संपत्तीच्या 45 टक्के होती, जी 2012 मध्ये वाढून 63 टक्के आणि**



**2022 मध्ये आणखी वाढून 80 टक्क्यांहून अधिक झाली आहे. वरच्या 1 टक्के श्रीमंतांकडे देशाच्या 40 टक्क्यांहून अधिक संपत्ती जमा झाली आहे, तर खालच्या 50 टक्के लोकांकडे एकूण संपत्तीच्या फक्त 3 टक्के आहे.**

कोरोना महामारीच्या काळात जेव्हा सामान्य जनता अन्नाला मोताद झाली होती, त्या काळात सुद्धा मोदींच्या कृपेमुळे भारतातील अब्जाधीशांच्या संपत्तीत प्रतिदिन 3608 कोटी रुपयांची वाढ झाली आहे. आकडेवारीनुसार 2020 ते 2021 दरम्यान भांडवलदारांच्या संपत्तीत 121 टक्क्यांनी वाढ झाली आहे. **अहवालानुसार भारतातील 100 सर्वात श्रीमंत लोकांची संपत्ती 660 अब्ज डॉलर्स (सुमारे 54 लाख 12 हजार कोटी रुपये) च्या पुढे गेली आहे.** एवढ्या पैशात भारताचे संपूर्ण बजेट 18 महिने चालवता येईल. **2019 मध्ये मोदी सरकारने कॉर्पोरेट कराचा दर 30 टक्क्यांवरून कमी करून 22 टक्के** आणि नव्याने बनलेल्या कंपन्यांसाठी 15 टक्के केला होता. त्यामुळे 1.84 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. ही **तूट भरून काढण्यासाठी सरकारने पेट्रोल-डिझेलचे दर आणि जीएसटीचे दर वाढवले.** ऑक्सफॅमच्या अहवालानुसार 50 टक्के गरीब जनता जीएसटीचा 64 टक्के भाग देत आहे, जेव्हाकी कराचा केवळ 10 टक्के हिस्सा श्रीमंतांच्या खिशातून येत आहे. एवढेच नाही तर केंद्र सरकारने 2020-21 मध्ये देशातील **कॉर्पोरेट घराण्यांना करामध्ये 1 लाख कोटी रुपयांहून अधिक सूट दिली होती. ही करसवलत मनरेगाच्या बजेटपेक्षा जास्त होती!**

## "गरीब का बेटा" मोदींचे कामगार विरोधी कारनामे

भांडवलदारांना कामगारांच्या एकेका धमनीतून रक्त पिळून घेण्यास समर्थ करण्यासाठी मोदी सरकारने खूप कष्ट घेतले आहेत. यासाठी मोदी सरकारने कामगार कायद्यांमध्ये केलेल्या बदलांवर आणि 2023-24 च्या अर्थसंकल्पावर एक नजर टाकणे पुरेसे ठरेल.

भारतात बनलेले कामगार कायदे सुरुवातीपासूनच अपुरे होते. जे कायदे होते ते सुद्धा असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या अफाट लोकसंख्येसाठी क्वचितच अमलात येत होते. असलेले कायदेसुद्धा वेळोवेळी भांडवलदारांच्या बाजूने बदलवले गेले आहेत. पण आता मोदी सरकारने भांडवलदारांना उरल्या सुरल्या कामगार कायद्यांच्या अडचणीतून मुक्त करून कामगारांचे शोषण तीव्र करण्यासाठी **44 केंद्रीय कामगार कायद्यांच्या जागी चार कोड किंवा संहिता बनवल्या आहेत:**

मजुरीची संहिता (कोड ऑन वेजेस, Code on Wages), व्यावसायिक सुरक्षिततता, आरोग्य व कार्यस्थिती संहिता (The Occupational Safety, Health and Working Conditions Code, 2020), सामाजिक संरक्षण संहिता (The Code on Social Security, 2020), औद्योगिक संबंध संहिता (The Industrial Relations Code 2020)


मजुरीच्या कोड किंवा संहितेअंतर्गत संपूर्ण देशासाठी किमान मजुरीची पातळी निश्चित केली जाईल. सरकारचे म्हणणे आहे की त्रिपक्षीय समिती ही पातळी ठरवेल, **परंतु या सरकारचे कामगार मंत्री मालकांप्रती औदार्य दाखवून किमान मजूरी प्रतिदिन 178 रुपये करण्याची घोषणा आधीच करून बसले आहेत. म्हणजेच मासिक उत्पन्न फक्त 4,628 रुपये असेल!** ही रक्कम आर्थिक सर्वेक्षण 2017 द्वारे सुचवलेल्या आणि सातव्या वेतन आयोगाने निश्चित केलेल्या 18,000 रुपयांच्या किमान मासिक वेतनाच्या फक्त एक चतुर्थांश आहे. एवढेच नव्हे तर 15 व्या राष्ट्रीय कामगार परिषदेच्या (1957) शिफारशींकडे (ज्यानुसार किमान वेतन हे अन्न, वस्त्र, घर इत्यादी मूलभूत गरजांच्या आधारे निश्चित केले गेले पाहिजे) आणि सर्वोच्च न्यायालयाच्या 1992 च्या निर्णयाकडे दुर्लक्ष करून आवश्यक उष्मांक (कॅलरी) वापर 2700 ऐवजी 2400 करण्यात आला आहे आणि सर्व मूलभूत वस्तूंची किंमत देखील 2012च्या किमतीच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे.

**या संहितेने 'रोजगार सूची' काढून टाकली आहे जी कामगारांना कुशल, अर्ध-कुशल आणि अकुशल श्रेणींमध्ये वर्गीकृत करायची. अगोदरच बहुसंख्य औद्योगिक क्षेत्रांत कुशल मजुरांचे काम करवून मजुरी मात्र अकुशल कामगाराची दिली जात आली होती. आता हे काम कायदेशीर मार्गाने होणार आहे.**

या संहितेत किमान वेतनाचा दर वेळेनुसार (टाईम वर्क) आणि प्रमाणानुसार (पीस वर्क) निश्चित केला जाईल आणि कामाचा वेळ तासानुसार, दिवस किंवा महिन्यांनुसार असू शकेल. **हा नियम किमान वेतनाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची पायमल्ली करतो, ज्यानुसार किमान वेतन निश्चित करताना अन्न, वस्त्र, वैद्यकीय खर्च, कौटुंबिक खर्च, शिक्षण, इंधन, सण, उत्सव, म्हातारपण आणि इतर खर्च विचारात घेतले गेले पाहिजेत.**

संहितेत मजुरांकडून अतिरिक्त काम करून घेण्यासाठीची सुद्धा कायदेशीर व्यवस्था करण्यात आली आहे. सध्याच्या व्यवस्थेत एका दिवसात 9 तासांपेक्षा

जास्त आणि आठवड्यातून 48 तासांपेक्षा जास्त काम असेल तर त्याला ओव्हरटाइम म्हणतात. **ओव्हरटाईमची ही व्याख्या काढून टाकून, "पूरक काम" आणि "अनिरंतर काम" सारखी आलंकारिक भाषा वापरून ओव्हरटाईमसाठी मिळणारी अतिरिक्त मजुरी बंद करून टाकण्याची ही खेळी केली गेली आहे.** या संहितेत सरकारी अधिकाऱ्यांना कंपन्यांच्या परवानगीशिवाय त्यांची बॅलन्स शीट उघड करण्यास बंदी घालण्यात आली आहे. याकरिता *"कंपन्यांवर विश्वास ठेवला पाहिजे!"* असा तर्क दिला गेला आहे. या कोडमध्ये इंटरनेटद्वारे 'सेल्फ सर्टीफिकेशन' करण्याची देखील तरतूद आहे, **म्हणजेच मालक स्वत:च स्वतःला प्रमाणपत्र देईल की त्याच्या कारखान्यात सर्व कामगार कायदे पाळले जात**




**आहेत!** वेतन सुधारणेसाठी निश्चित केलेली कालमर्यादा जी पूर्वी दर 5 वर्षांच्या कालांतराने अनिवार्य होती, ती आता रद्द करण्यात आली आहे आणि 5 वर्षांत पुनरवलोकनाचा पर्याय जोडण्यात आला आहे. हे सर्व तेव्हा, जेव्हा देशातील महागाई दर वर्षी गगनाला भिडत आहे.

**समान वेतन कायदा 1976** ने याची खात्री दिली होती की वेतन किंवा भरती किंवा रोजगाराच्या अटींमध्ये कोणताही लिंगभेद चालणार नाही. परंतु वेतन संहितेतून हा मुद्दा पूर्णपणे काढून टाकून, मालकांना महिला कामगारांना कमी वेतन देण्याची कायदेशीर सूट देण्यात आली आहे.

**'व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्य व कार्यस्थिती संहिते'**मध्ये तर असंघटित कामगारांना कोणतेही स्थान दिलेले नाही. 10 पेक्षा जास्त कामगार काम करणाऱ्या कारखान्यांनाच केवळ हे लागू होईल. या संहितेनुसार एखाद्या धोकादायक काम

असणाऱ्या कारखान्यात किमान 250 कामगार असले पाहिजे किंवा सामान्य कारखान्यात 500 कामगार असावेत, तरच सुरक्षा समिती स्थापन करणे आवश्यक असेल. **कारखाना कायदा, 1948** च्या जुन्या कायद्याने कामगार जास्तीत जास्त किती रासायनिक आणि विषारी पदार्थांच्या वातावरणात काम करू शकतात हे स्पष्ट केले गेले होते, तर नवीन कोडने हे स्पष्टपणे नमूद न करता, रासायनिक आणि विषारी पदार्थांचे प्रमाण निश्चित करण्याचे काम राज्य सरकारवर सोडले आहे.

**'सामाजिक संरक्षण संहिते'द्वारे** सर्व संरक्षण मालकांच्या आणि सर्व असुरक्षितता कामगारांच्या नावे करण्यात आली आहे. कोट्यवधी असंघटित कामगार आधीच ई.एस.आय., पी.एफ., आरोग्य विमा, पेन्शन इत्यादी सामाजिक सुरक्षिततेपासून वंचित आहेत. या संहितेत कामगारांच्या कल्याणाची धोरणे बनवणाऱ्या आणि लागू करणाऱ्या संस्थांच्या रूपात राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा परिषद, केंद्रीय बोर्ड आणि राज्य बोर्डांबाबत बोलले गेले आहे, ज्यामध्ये ट्रेड युनियनांची कोणतीही भूमिका नसेल. सामाजिक सुरक्षेसाठी फंड बनवण्याबाबत बरीच जुमलेबाजी केली गेली आहे, पण हा पैसा कुठून येणार आणि तो कामगारांसाठी कसा खर्च होणार याबाबत ठोस यात काहीही उल्लेख नाही.

**अशीच आलंकारिक भाषा वापरून या कामगार संहितेने नोकरदार महिलांच्या मोठ्या लोकसंख्येला मातृत्व लाभांपासून वंचित केले आहे.** प्रसूतीपूर्वी आणि नंतर महिलांकडून काम करवण्यास बंदी घालण्यात आली आहे. परंतु यातच पुढे असे सांगितले आहे की ज्या महिलेने "तिच्या प्रसूतीपूर्वीच्या 12 महिन्यांत कमीत कमी 80 दिवस एखाद्या आस्थापनेत काम केले असेल" ती मातृत्व लाभ मिळण्यास पात्र असेल.

**सरकारने तीन जुने कामगार कायदे , म्हणजे औद्योगिक विवाद कायदा 1947, ट्रेड युनियन कायदा 1926 आणि औद्योगिक रोजगार कायदा 1946 हटवून त्याऐवजी औद्योगिक संबंध संहिता आणली आहे. याअंतर्गत ज्या कारखान्यांमध्ये 300 पर्यंत कामगार कामावर आहेत त्या कारखान्यांना कामगारांना कामावरून काढून टाकण्यासाठी सरकारच्या परवानगीची आवश्यकता नाही (पूर्वी ही मर्यादा 100 होती).** व्यवस्थापनाला 60 दिवसांपूर्वी नोटीस दिल्याशिवाय कामगार संपावर जाऊ शकत नाहीत. जर एखाद्या औद्योगिक न्यायाधिकरणात त्यांच्या प्रकरणाची सुनावणी सुरू असेल, तर निर्णय होईपर्यंत कामगार संपावर जाऊ शकत नाहीत. **या बदलांचा सरळ अर्थ असा आहे की**

**कारखान्यांमध्ये संप करणे जवळजवळ अशक्य होईल** कारण जर तेथे 300 पेक्षा कमी कामगार असतील (जे कागदावर दर्शविणे सोपे आहे), तर कंपनी संपाच्या 60 दिवसांच्या नोटिस कालावधीत सहजपणे कामगार कपात करू शकते आणि नवीन लोकांची भरती करू शकते.

**या संहितेनुसार कंपन्यांना कितीही कालावधीसाठी कंत्राटी कामगार नियुक्त करण्याचा अधिकार मिळाला आहे. त्याला फिक्स्ड टर्म एम्प्लॉयमेंट असे नाव देण्यात आले आहे.** स्पष्टच आहे की कंत्राटी पद्धत पूर्णपणे कायदेशीर करण्याची तयारी सुरू झाली आहे.

नवीन कामगार संहितेत कारखान्याची व्याख्या बदलण्यात आली आहे. **नवीन व्याख्येनुसार, विजेचा वापर असलेल्या कारखान्यात किमान 40 कामगार काम करत असतील तरच तिथे कामगार कायदे लागू होतील. यापूर्वी ही संख्या 20 मजुरांची होती.** याशिवाय जेथे वीज वापर होत नाही तेथे त्यांची संख्या 10 वरून 20 पर्यंत वाढवण्यात आली आहे. **म्हणजेच कारखान्यात किमान 20 कामगार असतील तरच कामगार कायदा लागू होईल. म्हणजेच मजुरांच्या बहुसंख्येला कामगार कायद्याच्या कक्षेतून बाहेर करण्यात आले आहे.** आता त्यांची जबाबदारी ना कारखानदाराची असेल ना सरकारची.

ग्रामीण भागात कामगार कायदे आणि ते लागू करणारी संरचना पूर्वीही नव्हती. आता नव्या कामगार संहितेत ग्रामीण क्षेत्राला कामगार कायद्यांच्या कक्षेत आणून संरचना निर्माण करण्याचा तर प्रश्नच उद्भवत नाही.

तथापि, युनियन्सच्या/संघटनांच्या तीव्र विरोधामुळे या कायद्यांची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही परंतु पुढील काळासाठी कामगार कायद्यांचा आराखडा (रोडमॅप) मोदी सरकारने तयार केला आहे.

2023-24 च्या सध्याच्या अर्थसंकल्पावरूनही मोदी सरकारचे गरीब प्रेम समजू शकते. या अर्थसंकल्पात मोदी सरकारने जनतेच्या प्रत्येक घटकाला संकटात लोटले आहे. हे समजून घेण्यासाठी आपण केंद्रीय अर्थसंकल्पावर एक नजर टाकूयात. खाली दिलेला तक्ता स्वतःच सर्व सत्य सांगत आहे.

| योजना | 2022 मध्ये दिलेले बजेट | 2023 मध्ये दिलेले बजेट |
|---|---|---|
| पंतप्रधान गरीब कल्याण योजना | 10 किलो मोफत धान्य | 5 किलो मोफत धान्य |
| राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा | 2. 14 लाख कोटी | 1.37 लाख कोटी |
| मध्यान्ह भोजन योजना (आता प्रधानमंत्री पोषण योजना) | 12,800 कोटी | 11,600 कोटी |
| प्रधानमंत्री किसान योजना | 70,000 कोटी | 60,000 कोटी |
| मनरेगा | 89,400 कोटी | 61,000 कोटी |
| खत अनुदान | 2.25 लाख कोटी | 1.75 लाख कोटी |
| श्रम आणि रोजगार मंत्रालय | 16,084 कोटी | 12,474 कोटी |
| कामगार कल्याण मंत्रालय | 120 कोटी | 75 कोटी |
| प्रधानमंत्री कर्मयोगी मानधन पेन्शन योजना | 50 कोटी | 3 कोटी |
| आत्मनिर्भर भारत रोजगार योजना | 6400 कोटी | 2,272 कोटी |

## भांडवलदारांना खैरात

| निधी | 2022 मध्ये दिलेले बजेट | 2023 मध्ये दिलेले बजेट |
|---|---|---|
| छोट्या-मध्यम भांडवलदारांच्या उपक्रमांसाठी | 5455 कोटी | 21,422 कोटी |
| मोठया भांडवलदारांच्या फायद्यासाठी पायाभूत सुविधा योजनांमधील गुंतवणूक | 7.28 लाख कोटी | 10 लाख कोटी |

मोदी सरकारने कामगार, गरीब शेतकरी, महिला म्हणजे सर्वसामान्य जनतेच्या सर्वच घटकांवर वार केला आहे. पण त्या भांडवलदारांसाठी अच्छे दिन आणण्यात मोदी सरकारने कोणतीही कसर सोडलेली नाही ज्यांनी मोदींना सत्तेवर आणण्यासाठी आपल्या तिजोऱ्या खुल्या केल्या होत्या.

## अशावेळी आपण कामगारांनी शेवटी करावे तरी काय?

**साथींनो! सध्याची नफाकेंद्रित भांडवली व्यवस्था कामगार वर्ग आणि सर्वसामान्य कष्टकरी जनतेला हेच देऊ शकते.** भाजप, काँग्रेस, सप, बसप, आप या भांडवलदार पक्षांचे काम भांडवलदार वर्गाद्वारे कष्टकरी वर्गाला जास्तीत जास्त पिळून काढण्याची व्यवस्था करणे हे आहे. सीपीआय, सीपीएम, सीपीआयएमएल (लिबरेशन), एसयूसीआय सारखे नकली डावे पक्ष आणि त्यांच्या संलग्न संघटना या नफा-केंद्रित व्यवस्थेत कामगार वर्गाला छोट्या आर्थिक मागण्यांच्या लढाईत गुंतवून त्यांचा श्रम कायम ठेवण्याचे काम करतात. वास्तवात, जोपर्यंत यंत्रे, कारखाने इत्यादी उत्पादनाची साधने आणि जमीन मोठ-मोठ्या परजीवी भांडवलदारांच्या आणि धनदांडग्यांच्या हातात आहे, जोपर्यंत शासन-प्रशासन याच धनाढ्यांच्या प्रतिनिधींच्या हातात आहे आणि निर्णय घेण्याची ताकत त्यांच्या हातात आहे तोपर्यंत कामगार वर्ग आणि संपूर्ण कष्टकरी लोकसंख्या शोषणापासून मुक्त होऊ शकत नाही. कामगार वर्गाची खरी मुक्ती तेव्हाच शक्य आहे जेव्हा ही नफाकेंद्रित भांडवलशाही व्यवस्था ध्वस्त करून उत्पादनाच्या साधनांवर कामगारांच्या सामूहिक मालकीची व्यवस्था स्थापित होईल, शासन-प्रशासनावर कामगार वर्गाच्या प्रतिनिधींचा ताबा असेल आणि निर्णय घेण्याची शक्ती त्यांच्या हातात असेल. **शहीद भगतसिंह** यांच्यासारखे महान क्रांतिकारक अशाच समाजाच्या निर्मितीसाठी लढताना शहीद झाले. एका समतामूलक समाजाच्या उभारणीचे स्वप्न आज भलेही जरी दूरचे वाटत असेल, भलेही कामगार वर्गाच्या गौरवशाली क्रांतिकारी भूतकाळाला धूळ आणि राखेखाली गाडून कामगार वर्गाचा आत्मविश्वास काही प्रमाणात कमकुवत करण्यात लुटीवर आणि खोट्यावर टिकलेली प्रसारमाध्यमे एका मर्यादेत यशस्वी झाली असतील, पण ही परिस्थिती नेहमीच अशी राहणार नाही. कामगार वर्ग भूतकाळातील क्रांत्यांना आणि त्याच्या क्रांतिकारक पूर्वजांना

जाणून, त्यांच्याकडून शिकून आणि क्रांतिकारी विचारधारेने सज्ज होऊन लुटीवर आधारित ही व्यवस्था उखडून टाकेल.

**सध्याचे फॅसिस्ट मोदी सरकार हे कामगार, गरीब शेतकरी आणि जनतेचे सर्वात मोठे शत्रू आहे.** मालक, कंत्राटदार, दलाल, श्रीमंत भांडवलदार शेतकरी आणि जमीनमालक, प्रॉपर्टी डीलर, बिल्डर, सट्टेबाज आणि बडे दुकानदार यांची मंदीच्या काळात उत्तम सेवा फक्त मोदी आणि संघ परिवारच करू शकतात. कारण नफ्याचा सरासरी दर घसरण्याच्या संकटाने भयभीत धनदांडग्यांची आज गरज आहे कामगारांचे सर्व हक्क काढून घेऊन त्यांचे वेतन खाली आणणे, आवाज उठवला तर त्यांच्यावर लाठी-गोळी चालवणे आणि कामगारांच्या बाजूने बोलणाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून तुरुंगात टाकणे याची. ही सर्व काळी कृत्ये मोदी-शहांच्या हुकूमशाही फॅसिस्ट सरकारखेरीज इतक्या कुशलतेने कोण करू शकेल? यामुळेच अंबानी, अदानी, टाटा, बिर्ला या सर्व मातब्बरांनी इतर पक्षांना नाममात्र देणग्या दिल्या पण भाजपवर इतका अमर्याद नोटांचा वर्षाव केला की त्याची मालमत्ता रु. 5,000 कोटींच्या जवळ पोहोचली आहे! **दुसरे कारण हे की संघ परिवार आणि भाजपची मोदी-शहा जोडीच आम्हा कष्टकरी लोकांना धर्माच्या नावावर आपापसात लढवून एकत्र येण्यापासून रोखते, कारण जात-धर्माचे भांडण बाजूला ठेवून कष्टकरी जनता एक झाली तर त्यामुळे त्यांची सर्व पैशाची शक्ती कमजोर पडेल आणि त्यांची सत्ता कोसळण्यास वेळ लागणार नाही.** म्हणूनच त्यांचे कटकारस्थान समजून घेतले पाहिजे साथींनो! धर्म, जात, भाषेच्या आधारावर फूट पडू न देता आणि एकजुटीने लढून आपल्या दैनंदिन जगण्याचे हक्क आपल्याला मिळवायचे आहेत. केवळ आपण कामगार आणि कष्टकरी लोकच सध्याच्या फॅसिस्ट उठावाचा पराभव करू शकतो आणि हा लढा संपूर्ण व्यवस्था बदलण्याच्या



लढ्याशीही जोडलेला आहे, जे आपले दीर्घकालीन ध्येय आहे.

**पण ही निर्णायक लढाई गाठायची असेल तर आधी आपल्याला आपण जिवंत असल्याचा पुरावा द्यावा लागेल. सर्वप्रथम आपल्याला ते अधिकार हिरावले जाण्यापासून वाचवायचे आहेत जे आपल्या पूर्वजांच्या संघर्षामुळे सध्याच्या व्यवस्थेच्या चौकटीत आपल्याला मिळाले होते किंवा आपण संघटित लढा देऊन धनाढ्यांच्या सरकारांना आणि व्यवस्थेला ते अधिकार आपल्याला देण्यास भाग पाडले होते.** आज धर्म आणि जातीच्या आधारावर विभागून आपल्याला आपापसात लढवले जात असताना सध्याचे राज्यकर्ते एक-एक करून ते सर्व हक्क हिरावून घेत आहेत. त्यामुळे आपल्याला पुन्हा संघटित होऊन त्या हक्कांसाठी लढावे लागेल. भांडवलशाही राज्यघटनेने कामगारांना दिलेल्या आश्वासनांवर आपला हक्क आपल्याला सांगावा लागेल आणि तसेच आपले हक्क वाढवण्यासाठी देशव्यापी संघर्ष सुरू करावा लागेल. या लढ्याच्या अनुभवांतून आणि क्रांतीच्या विज्ञानातूनच आपण आपले दीर्घकालीन उद्दिष्ट कसे पूर्ण करायचे हे देखील शिकू. म्हणूनच आपले पहिले तात्कालिक लक्ष्य आपल्या आजच्या सर्वात मूलभूत आणि प्रासंगिक मागण्या समजून घेणे, त्याबद्दल लोकांना जागृत करणे आणि संघटित होऊन त्यांच्यासाठी लढा उभारणे हे आहे. **भगतसिंह जनअधिकार यात्रा** याच अत्यंत महत्त्वाच्या कार्याची सुरुवात करत असून त्यात तुमचा सहभाग आवश्यक आहे.

## कामगार-कष्टकऱ्यांच्या मूलभूत मागण्या

**'भगतसिंह जनअधिकार यात्रा' याच संघर्षातील महत्त्वाचा दुवा आहे.** ही यात्रा देशातील 11 राज्यांतील कामगार-कष्टकऱ्यांमध्ये या मागण्यांबाबत जागृती निर्माण करेल, त्यांना या मागण्यांभोवती संघटित करेल. **'भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाच्या'** (RWPI) नेतृत्वाखाली आणि अनेक प्रगतीशील संघटना आणि जनसंघटनांच्या सहभागाने हा प्रवास अनेक टप्प्यात चालेल, मोदी सरकार किंवा येणाऱ्या कोणत्याही सरकारला या मुद्द्यांवर जाब विचारेल आणि आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी विना-तडजोड संघर्ष करेल. आम्ही आमच्या कामगार आणि कष्टकरी साथींना खालील मागण्यांसाठी संघटित होण्याचे आणि सरकारला घेरण्याचे आवाहन करतो:

1. **रोजगाराचा अधिकार मूलभूत अधिकारांमध्ये समाविष्ट केला जावा.** त्यासाठी आवश्यक घटनादुरुस्ती केली जावी आणि **'भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा'** पारित करण्यात यावा, याअंतर्गत सरकारने वर्षभर कायमस्वरूपी रोजगाराची हमी द्यावी. रोजगार देऊ न शकल्यास प्रत्येक बेरोजगाराला रु. 10,000 बेरोजगार भत्ता द्यावा.

2. तांत्रिक विकासाची सध्याची पातळी लक्षात घेता **6 तास कार्यदिवसाचा कायदा** बनवला जावा. महागाईचा सध्याचा स्तर लक्षात घेता **रोजचे किमान वेतन रु. 800 आणि मासिक रु. 25,000** केले जावे आणि महागाईच्या दरानुसार ते ठरावीक अंतराने वाढवले जावे.

3. **कुख्यात कामगार विरोधी सर्व चार नवीन श्रम संहिता तत्काळ रद्द कराव्यात.**

4. मानकांनुसार मजुरांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण व्यवस्था केली जावी. कमी वेतनामुळे कामगारांना ऐच्छिक किंवा सक्तीने ओव्हरटाईम करावे लागण्याची बाध्यता संपवली जावी. रात्रीचे काम रद्द करावे आणि ज्या उद्योगांमध्ये हे अपरिहार्य आहे अशा उद्योगांमध्येच त्याला परवानगी

द्यावी आणि त्यामध्ये सुद्धा रात्रीच्या कामाचा कालावधी चार तासांपेक्षा जास्त नसावा. याचे संचालन प्रत्येक उद्योगातील कामगार संघटनांच्या देखरेखीखाली केले जावे. **वर नमूद केलेल्या गोष्टींची हमी देण्यासाठी कामगार कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणा केल्या जाव्यात. त्यांचे उल्लंघन हे गुन्हेगारी कृत्य म्हणून वर्गीकृत केले जावे आणि यासाठी किमान तीन महिन्यांचा अजामीनपात्र कारावास असावा.**

5. **शेतमजुरांसह ग्रामीण मजुरांना कामगार कायद्यांच्या कक्षेत आणावे आणि त्यांची खातरीशीर अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती संरचना उभी केली जावी.**

6. **आशा-अंगणवाडी-पंचायत मित्र व इतर योजना कामगारांना कर्मचाऱ्यांचा दर्जा व वेतनश्रेणीनुसार वेतन देण्यात यावे.**

7. **प्रत्येक प्रकारच्या नियमित कामात ठेकेदारी पद्धत आणि तात्पुरते काम समाप्त केले जावे.**

8. **प्रत्येक विभागात महिलांना पुरुषांएवढे समान वेतन देण्याची व्यवस्था लागू करावी. सर्व महिला मजुरांना प्रसुतीच्या सहा महिने आधी आणि प्रसूतीनंतर सहा महिने पूर्ण वेतनासह रजा देण्यात यावी. ज्या कारखान्यांमध्ये महिला काम करतात तेथे स्वच्छ स्वच्छतागृहे, पाळणाघर आणि नर्सरीसाठी योग्य व्यवस्था करण्यात यावी.**

9. मजूर आणि सामान्य कष्टकरी लोकांसाठी **सरकारी विम्याची संपूर्ण व्यवस्था** करण्यात यावी. या अंतर्गत प्रत्येक प्रकारचे अपंगत्व, आजार, मुलांचे जन्म, जीवनसाथीचा मृत्यू, अनाथ होणे या सर्व बाबींमध्ये विम्याची रक्कम सरकारकडून देण्यात यावी. त्यासाठी विशेष कर लावून भांडवलदारांकडून पैसा वसूल केला जावा.

10. **घरकामगारांसाठी एक स्वतंत्र लेबर एक्स्चेंज (श्रम विनिमय कार्यालय) तयार करण्यात यावा, ज्यामध्ये त्यांची नोंदणी केली जाईल आणि कोणालाही घरकामगाराची गरज भासल्यास या एक्स्चेंजच्या माध्यमातून कामगार उपलब्ध केले जातील.** किमान वेतनासह कामगार कायद्यात दिलेले हे सर्व अधिकार घरकामगारांना देण्यात यावेत.

घरकामगारांच्या सन्मानासाठी, त्यांना घरात समान वागणूक मिळावी आणि त्यांच्या रोजगाराची हमी खातरीशीर व्हावी यासाठी वेगळा विशेष कायदा करावा. घरकामगारांच्या ओळख आणि नोंदणी सोबतच **मालकांचीसुद्धा पडताळणी, ओळख आणि नोंदणी** केली जावी.

11. **तथाकथित लेबर चौकातील मजुरांसाठी सुद्धा स्वतंत्र लेबर एक्स्चेंज उभारावे. ज्यामध्ये त्यांचे दैनंदिन वेतन किमान वेतनाप्रमाणे असावे आणि कामाच्या तासांचे नियमन करण्यात यावे.**

12. **कोणत्याही मालकाने मजुराला 7 किंवा अधिक दिवस कामावर ठेवल्यास त्याला सवेतन साप्ताहिक सुट्टी दिली जावी.**

13. **मोठ्या प्रमाणावर भरती करून सरकारच्या कामगार विभागाचा विस्तार करावा.** नवीन कामगार निरीक्षक, कारखाना निरीक्षक आणि बॉयलर निरीक्षक एवढ्या संख्येने भरती करावेत की सर्व आर्थिक युनिट्सची नियमित आणि कसून तपासणी करता येईल. सर्व तपासणी पथके **'थ्री-इन-वन' तत्त्वावर** गठित करण्यात यावी, ज्यात सरकारने नियुक्त केलेले निरीक्षक, कामगार युनियन/संघटनांचे निवडून आलेले प्रतिनिधी, मालकांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. त्यात **कामगार प्रतिनिधी बहुसंख्य असावेत.**

14. **सर्व औद्योगिक युनिटमधील श्रम आणि उत्पादन व्यवस्थापित करण्याचे काम कामगारांचे निवडून आलेले प्रतिनिधी, व्यवस्थापक आणि तंत्रज्ञ यांच्या 'थ्री-इन-वन' समित्यांना देण्यात यावे. उत्पादनाचा वेग आणि त्याची उद्दिष्टे या समितीनेच ठरवावीत.**

15. **सरकारी विभागातील खाजगीकरणाची धोरणे मागे घेण्यात यावीत.**

16. नवीन पेन्शन योजना रद्द करून **जुनी पेन्शन योजना पूर्ववत केली जावी.**

17. **कामगार व कर्मचाऱ्यांचा संपासारखा लोकशाही हक्क दडपण्यासाठी केलेले एस्मा सारखे कायदे रद्द करावेत.**

18. सर्व कष्टकरी लोकांसाठी सरकारी **निवासाची व्यवस्था** करण्यात यावी. सरकारने सर्व रिकाम्या खाजगी सदनिका, फ्लॅट्स आणि घरे जप्त करून ती कामगारांना भोगाधिकाराच्या तत्त्वावर द्यावीत.

19. **सर्व प्रकारचे अप्रत्यक्ष कर जसे की एसजीएसटी/जीएसटी, वॅट, सेस इत्यादींवर ताबडतोब बंदी घालून प्रगतीशील प्रत्यक्ष कर पद्धत लागू करावी.**

20. **सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशनची प्रभावी व्यवस्था निर्माण करण्यात यावी आणि प्रत्येक भागात अनुदानित सरकारी रेशन दुकाने उघडण्यात यावीत.** मजुरांसाठी अनुदानित उपाहारगृह उघडली जावीत.

21. **शालेय वयाच्या (सोळा वर्षांखालील) युवकांकडून व मुलांकडून काम करून घेण्यावर पूर्ण बंदी असावी.** 16 ते 18 वयोगटातील कामगारांचे कामाचे तास चारपेक्षा जास्त नसावेत.

22. महिला कामगारांना रोजगार देणाऱ्या सर्व उद्योगांसाठी **महिला कामगार निरीक्षकांची** व्यवस्था केली जावी.

23. सर्व उद्योगांसाठी स्वच्छतेचे कठोर नियम आणि कायदे बनवावेत, त्यानुसार सर्व औद्योगिक युनिट्समध्ये स्वच्छ बाथरूम, शौचालये इत्यादींची व्यवस्था करण्यात यावी. याच्या तपासणीसाठी कामगार विभागात स्वच्छता निरीक्षणालय स्थापित केले जावे.

24. वर नमूद केलेल्या गोष्टींची हमी देण्यासाठी कामगार कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणा केल्या जाव्यात आणि त्यांचे उल्लंघन हा दंडनीय गुन्हा म्हणून घोषित केला जावा.

**कामगार-कष्टकऱ्यांची वर्गीय एकजूट जिंदाबाद!**

**इंकलाब जिंदाबाद!!**

| यात्रेचा व्हॉलंटियर फॉर्म भरण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा.करा. | यात्रेबद्दल अधिक माहितीकरिता हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. | यात्रेच्या व्हाट्सअप ग्रुपसोबत जोडून घेण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. |
| --- | --- | --- |

## आयोजक

# भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (RWPI)

### नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना, स्त्री मुक्ती लीग, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन

## संपर्क

**महाराष्ट्र:** परमेश्वर 7798364729, बबन 9619039793
**दिल्ली:** योगेश 9289498250, प्रियंवदा 9693469694
**उत्तर प्रदेश:** अमित 8858288593, अविनाश 9891951393
**हरियाणा:** इंद्रजित 8010156365, अजय 8685030984
**बिहार:** अजित 6297974751, वारुणी 7070571498
**उत्तराखंड:** कविता 9971158783, अपूर्व 7042740669
**पंजाब:** इंजिंदर 9888080820, सुखजिंदर 9815705653
**आंध्र प्रदेश:** श्रीनिवास 7995828171, अरुणा 8500208259
**तेलंगणा:** आनंद 9971196111; **चंडिगढ:** शुभम 8196803093

WhatsApp Number : 9923875414    /bsjayatra